This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit. The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र M-1986 विषय

नाव. चरित्र कौस्तुभमणी (एकादशाची संक्षिप्त चरित) (मराठी) MSS

लेखक/लिपीकार राजा बासुदेव वायसुंदर

पृष्ठ 16 काळ — पूर्ण/अपूर्ण

Checked 2012

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

M 1986
25/4/011

॥ श्री ॥

श्री समर्थ सद्गुरू बाबासाहेब गटीकर महाराज

व

श्री समर्थ सद्गुरू बापूराव महाराज खालखेडकर

यांच्या चरणी समर्पण.

॥ चरित्र कौस्तुभमणी ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ परमहंस ॥

॥ श्रीमत् सद्गुरु बाबासाहेब गढीकर महाराज ॥

॥ यांचे ॥

॥ एकाध्यायी संक्षिप्त चरित्र ॥

श्री सद्गुरुचरण रज

द. वा. वाचासुंदर

नागपूर

रविवार

दि. २१-४-१९७४

बाबासाहेब नाम सार॥ वेदशास्त्रांचे गूज॥ संसार दुःख नासे॥ महामंत्राचे बीज॥

॥ परब्रम्ह गुरुराज ॥

संतदासानुदास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्री समर्थ सद्‌गुरु परमहंस बाबासाहेब गदीकर प्रसन्न ।

श्री गुरु बापूंच्या दिव्य प्रस्फुरणीं ।
अंतःकरण हेलावुनि घडली पर्वणी ॥
सद्‌गुरु बाबांचा चरित्र कौस्तुभमणी ।
एकाध्यायीं ओविलासे ॥

रविवार
दि० २१.४.१९७४.

श्री समर्थ सद्‌गुरु बाबासाहेब गदीकर प्रसन्न ।
श्री सद्‌गुरु बापुराव महाराज समर्थ ।

श्री गुरु चरण सरोज रज, निज मन मुकुर सुधार ।
वरणौं सद्‌गुरु विमल यश जो दायक फल चार ।
॥ श्री हनुमते नमः ॥
श्री गणेशायनमः ।

ॐ नमोजी सच्चिदानंदा । ज्ञानातीत परम सुखदा ।
अवाङ्‌मनसगोचर अभेदा । शुद्धबुद्धा श्रीगुरुवर्या ॥१॥ श्री गुरो जे का
तुझे अनुग्रहित । विषय विरागी (विरक्त) अनन्यभक्त । तेचि तूंतें बहु
आवडत । कैवल्यनिधे कृपासिंधो ॥२॥ ऐशिया भक्तांचे चरित्र नित्य वदो
की माझे वक्त्र । प्रस्तुत चरित्र नायक । ब्राम्हण वर्णी माजी पैं ॥३॥
नारायणराव बाबा गदीकर देख । हे भगवद्‌भक्त परम चोख ।
एलिचपूर पट्टणा माझारी भक्त । नारायण जन्मले निर्धारी ॥४॥ हे
वर्णामाजी ऋग्वेदी ब्राम्हण । जन्म अठराशे सहासष्ट इसाईसन ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांचे उपनाम गढीकर असोन। घराणे सुशील जुनाट पैं ॥ ५ ॥
रामराव भाऊ महासत्वशील। भूतदया मनीं विपुल। आणि आचारहि
निर्मल। असे जयांचे सर्वदा ॥ ६ ॥ नित्यानंद परमहंस। जया रेवसेग्रामी
असे वास। तयांचा अनुग्रहो रामभाऊस। अधिकार परत्वे झाला असे ॥ ७ ॥
आप्पाजी महाराज आर्वीकर। रामभाऊचे गुरुबंधु साचार। मग तेथें
वसेल अविचार। ऐसे केवि घडेल पा ॥ ८ ॥ पुढा साध्वी सरस्वतीबाई
पोटीं। चरित्र नायक आले उठाउठी। नाम ठेविले बारशाकाळीं।
नारायण ऐसे आवडीने ॥ ९ ॥ सन अठराशे सहासष्टाआंत। सहा
अक्टोबर महिन्यांत। जगदोद्दारालागी संत। प्रगटले असती इलिचपुरी।
भक्तिभाव धर्म। प्रगटावया वर्णाश्रम कर्म। तैसेचि ईश्वरी ज्ञान वर्म।
आले नारायण दावावया ॥ ११ ॥ अंगी विरक्तीची छटा। अंतरीं विवेक
ज्ञानाचा गमे दिवटा। न दिसती तामस राजस चेष्टा। बाल्यावस्थीं
बाबाचे ॥ १२ ॥ नारायणरावाचे बाळपण। सुखें जाताचि निघोन।
पुढा पौंगंडावस्थीचि शिक्षण। देती आपण वडील यया ॥ १३ ॥ बाबा
मातापितराचे आज्ञाधारक। कुचाळी लबाडी यासी न ठाऊक।

वा चौर्यादि दुर्गुणसकळिक। पासून दूर बाबांचे ॥ १४ ॥ प्रभातकाळी
उठोन। मुखमार्जनादि विधी सारून। करिती कुळ देवता वंदन। तेवीचि
मातापितयासी ॥ १५ ॥ असो आंग्ल विद्येचा द्वितीय क्लास। बाबा उत्तीर्ण
झाले इलीचपुरास। अठराशे एकोणैंशी सनास। साचोकारे आपण कीं ॥ १६ ॥
ग्रामीचे शिक्षण पूर्ण होता। मागुते हायस्कूल शिक्षणाकरिता। बाबा
उमरावती येथे तत्त्वता। जाते झाले आपण पैं ॥ १७ ॥ असो ऐसे येथे
शिक्षण। घेवोनि मॅट्रिक्युलेशन। बाबा युनिव्हरसिटी लागून। गेले मागुते
मुंबईते ॥ १८ ॥ इसवी सन अठराशे शहाशी। बाबा उतरले परिक्षेसी
उपरी येउनि स्वग्रामासी। लागले अभ्यासी वकिलीच्या ॥ १९ ॥ पुढा
दीढ वर्ष साचा। प्लीडरशीप परिक्षेचा। अभ्यास करोनि नेमाचा।
उत्तीर्ण झाले कायदे कानु ॥ २० ॥ शिक्षण झाल्यावरी बाबाचे।
सीताबाईसी लग्न झाले साचे। परी कांही काळे सीताबाईचे।
स्वर्गारोहण झाले पैं ॥ २१ ॥ पुढे थोड्याचि काळे करून। नामे
लक्ष्मीबाईसी लग्न। महानंदे लागले पूर्ण। शिरपुरकर कन्येसी ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढे बाबा स्वये आपण। काढिती वकीलीचे लायसन। आणि
इलिचपुरी आपण। करिते झाले वकिली पैं ॥२३॥ सर्वदा अंतरी
नरहरी चिंतन। विसरती ना बाबा स्वये आपण। कचेरी जाताही
ग्रंथवाचन। करिती नारायण भक्तराज ॥२४॥ बाबांचा प्रामाणिकपणा
देखोन। पक्षकार विश्वासे येती आपण। बाबांचे मनीं भूतदया पूर्ण।
विलसे बहु सत्यत्वे ॥२५॥ नित्य नैमित्तीक कर्माचरण। नारायण
बाबा न सांडिती जाण। कधं नावडे संचयधन निःपक्ष वर्तनसर्वत्री ॥२६
परि संसार चालवून। नित्य ग्रंथावलोकन। करिती बाबास्वये आपण।
वेळ अवेळ न पाहता की ॥२७॥ उपासना मार्गावलंबन। कधं लागे
बाबा आपण। पुढे रामशास्त्रींची ख्याती ऐकून। नित्य येती स्वग्राम
उपासनादि मार्गाचे ज्ञान। नित्य करिती बाबा श्रवण। रामशास्त्रीहि
सद्भाव पाहून। ऐकविती प्रगल्भ मने ॥२९॥ रात्रौ अध्यात्म ग्रंथाचे
वाचन। करिती बाबा नित्य आपण। फावल्यावेळी एकांती जाऊन।
करिती मनन ग्रंथाचे ॥३०॥ आपणाशी सद्गुरु कैं भेटेल। संसार
बंधन कैं फिटेल। अहं ब्रम्हास्मि वचन फोल। सद्गुरुवीण मज वाटे ॥३१

ऐशी मनी चिंता वाढली। तों चि स्फूर्ति उठली चित्तीं। जावे सद्गुरु
दामोदरा प्रती। तुवा आता शरण पैं ॥३२॥ ईश्वरानुग्रह झाल्यावीण।
सद्गुरुहीन मिळती जाण। आणि सद्गुरु कृपेवीण। न टके जन्म
मरण जीवाचे ॥३३॥ असो बाबाठायीं प्रेमळ भक्ति। तेविंचि नांदे
ज्ञान विरक्ति। परी ब्रह्मात्म साक्षात्कारास्तव चित्तीं। चिंता प्रज्ञेप्रीतिबाबाच्या
॥३४॥ एवं तीव्र वैराग्य गढीकर मनी। होताचि स्फुरण उठले अंतःकरणीं।
कीं सद्गुरु गमती दोन्ही। घाटे आणि शेवाळकर ॥३५॥ असो
बाबा अधिकारासी पात्र। येथे उणीव नसेचि अणुमात्र। ऐसे सद्गुरु
देखोनि सर्वत्र। बोलला दामोदर बाबाकडे ॥३६॥ निद्रेमाजि ध्वनि
ऐकला। सद्गुरु तुझा दामोदर भला। जाई शरण तू तयाला।
त्वरे उशीर न लावि पा ॥३७॥ आर्वी अथवा वृंदावनी। किंवा असती
कवणे स्थानीं। हा विचार करीत असता मनीं। स्फुरण उठले
दुजे ऐसे ॥३८॥ सवेचि गढीकर बाबा आपण। शेगावी जाऊन
वंदिला गजानन। आणि एक रात्र तेथें करुनि शयन। शयनीं दृष्टांत
झाला ऐसा ॥३९॥ आर्वीग्रामाचि भी तरीं। असली तुझे सद्गुरु निर्धारिं।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तरी तू जाऊनि सत्वरी । भेट सत्य नारायणा ॥ ४० ॥ त्वरे आर्वी
ग्रामासी जाता । श्री गुरुदर्शन झाले तत्वता । चरणीं ठेवोनि माथा ।
आनंदाचित्ता न समाये ॥ ४१ ॥ आनंदाश्रूंनी ~~आलिंगिले~~ क्षालिले चरण ।
न सोडताचि दृढ धरिले पूर्ण । आणि मनेचि षोडोपचार पूजन ।
करिते झाले बाबास्वये ॥ ४२ ॥ आज्ञा होता पूर्ण । स्नानकरोनि
येती नारायण । तव दामोदरे अनुग्रह देऊन । उपासना विधि दाविला
पॅ ॥ ४३ ॥ श्री गोपाळकृष्ण उपासना । दाविली असे नारायणा ।
आणि आज्ञा दिली जावया जाणा । स्वगृहीं नारायणासी ॥ ४४ ॥
न सोडी गोपाळकृष्णाचे भजन । अनित्या सत्य न मानी जाण ।
सर्वभूति ब्राम्हचॅतन्य । एकचि जाणूनि असावे तुवा ॥ ४५ ॥ इतके
बोलुनिया श्रीगुरु । आता जाई म्हणती तू सत्वरु । संदेश येतां उशीर करु ।
नको यावया आता तरी ॥ ४६ ॥ बाबा नित्य अध्यात्माचे श्रवण ।
करुनि करिती मनीं मनन । ऐसा ध्यास लागलासे पूर्ण । रात्रंदिन
बाबासी ॥ ४७ ॥ असो श्रवण मनन निदिध्यासन । तेविची तत्व पदार्थ
शोधन । करी जों तो आपण । अधिकारी पूर्ण परमार्थी ॥ ४८ ॥

बाबा अनुग्रह घेऊनी । परत आलेति स्वस्थानी । परी वेध लागला
बहुमनीं । ईश्वर ध्यानी साचोकारा ॥ ४९ ॥ आपणासी भेटी लागून ।
बोलाविती सद्‌गुरु आपण । येणे तरी एकादशीचे आंत येऊन । ध्यावे
दर्शन सद्‌गुरुचे ॥ ५० ॥ बाबा म्हणती स्वमनीं । खचित दोन पत्रें आली
मज लागुनीं । आता मात्र सद्‌गुरु मर्वसेनी । असती आजारी फारची ॥ ५१ ॥
म्हणोनि बाबा काम सारोनि । गेले आर्वीग्रामालागोनी । हा दिवस होता
हरिदिनी । सत्य जाणा निर्धारे ॥ ५२ ॥ बाबा जाताचि सद्‌गुरुचरण ।
सद्‌भावे वंदिते झाले आपण । खचित सद्‌गुरुची प्रकृति अस्वस्थ देखून ।
गढीकर सखिन्न झाले पॅ ॥ ५३ ॥ पुढा व्दादशीदिन उजाडला । सद्‌गुरु
आज्ञापिती बाबासी तत्त्वता । तूं न लावी वेळ आतां । करी जा स्नान
सत्वरे पा ॥ ५४ ॥ असो श्री गुरु जवळी कोणी नसतां । गढीकरावाचूनि
सर्वथा । तईसद्‌गुरु वरदकर माथा । ठेविते झाले बाबाच्या ॥ ५५ ॥ आणि
आपुले हृदयीचे आत्मज्ञान । बाबाचे हृदयीं घालिती आपण । आणिकही
देणे ते देईन । म्हणती सद्‌गुरु बाबासी ॥ ५६ ॥ एवढे सद्‌गुरु बोलुनी ।
सिध्दासनी बॅसले नेत्र लावुनी । तंव बाबासी लाधली उन्मनी । ठेविती

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देह गुरुनाथ पैं ॥५७॥ असो अप्पाजी ब्रम्हीभूत होतां। बाबासावध
झाले तत्वता। तंव श्री गुरुमूर्तिसन्मुख देखता। दिसे झाली ब्रम्हीभूत ॥५८
मग अंत्यविधी सारुन। शिष्य करिती श्री गुरुभजन। तदुपरी सर्वत्र
समाधान। करिती आपण स्वये बाबा ॥५९॥ श्रीकृष्ण भक्तिवरी
प्रेम। विशेष वाढले दिसे निस्सीम। मुखावाटे श्री हरिनाम। अखंड
गर्जे वाणी पैं ॥६०॥ अखंड भागवताचे वाचन। करिती स्वये बाबा
आपण। भागवत वाचताचि अंगीं पूर्ण। अष्ट सात्विक भाव उचंबळती॥
असो शंकर महाराज परमहंस स्वये सिध्द। हे मार्तंडराव एकनिष्ठ
श्रीरामभक्ता कडोनि झाले प्रसिध्द। पुढे कांही वर्षे लोटता प्रबुध्द।
शंकर सिध्द भेटती बाबासी ॥६२॥ आपुले चरित्र नायकाची।
भेटी होता शंकर सिध्दाची। येथोनीचि गढीकर मनाची। एक सरा
स्थिती पालटली से ॥६३॥ एकदा बाबा ईश्वरार्चनी असता। शंकर
सिध्द आले स्वभावता। तव बाबा म्हणती तयां तत्वता। या बसा पायावरी।
तव सिध्द म्हणती माते। काहीं पैसे हवे त्वरिते। नक्की दोनशे रुपयाने भागते।
काम माझे सत्य पैं ॥६५॥ सिध्द बोलती बाबाते। जरी शंभर देता

निश्चिते। तरी पुनः वरी द्यावे खचिते। जास्त तुम्ही दहा पैं ॥६६॥ बाबांचे
आटोपता अर्चन। सवेचि कपडे घालून। तोचि एक कागद पत्र घेऊन। येता
झाला पक्षकार पैं ॥६७॥ तव पक्षकार बोले सावकाशे। मी तूर्त रुपये
देतो दोनशे। बाबा ते घेऊन पैं शे। शिलक पाहती आपण ॥६८॥ एकशे
दहा बाचित तव। दुसऱ्या दाव्यास्तव बचित ठेव। परिपूर्ण केला श्रीकृष्णे भाव।
शंकर सिध्दाचे मनोगतापरी ॥६९॥ काय असे सिध्दाचे मनोगत। हे न
कळे आम्हा सत्य। ऐसे वदोनि अर्ध्या प्रहरांत। रुपये पाठविली सिध्दाकडे ॥७०॥
एवं नाना चमत्कार। झाले सिध्दाचे बाबासी गोचर। आणि मधून मधून
सद्गुरु दामोदर। भेटती स्वप्नीं बाबासी ॥७१॥ तंव स्वप्नीं बाबाचे हातीं।
एक ग्रंथ दिधला निश्चिती। सद्गुरु विचारती बाबाप्रती। कवण ग्रंथ
हा सांगिजे ॥७२॥ तव बाबा स्वप्नामाझारीं। ग्रंथ उघडोनि पाहती निर्धारि।
तंव हा भागवत ग्रंथ साचोकारी। वदती सत्वरी गुरुलागी ॥७३॥
खचित सद्गुरुचा प्रिय ग्रंथ। नाम जयाचे श्रीमद् भागवत। तोचि स्वप्नी
दिधला ऐसी प्रतीत। आली मनीं बाबाच्या ॥७४॥ उपरी सद्गुरुची
आज्ञा मानून। करुं लागले ग्रंथ परिशीलन। तेणे जोडो लागले समाधान।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंतरी पूर्ण बाबाच्या ॥७५॥ ब्रम्हात्मैक्य खूण बाणली अंतरी । उसळती
सात्विक भावाच्या लहरी । भागवत राहे करीच्या करी । स्थितीनिर्धारी
तुष्णी होय ॥७६॥ निःशेष अज्ञान आवरण । निस्सरावया पाहिजे वैराग्य
पूर्ण । ऐसेसे संकल्प करून । उचंबळे मनबाबाचे ॥७७॥ पंचवीस
अध्याय वाचल्यावीण । भागवताचे न राहली बाबा आपण । वकिली
दिल्याही सोडून । प्रत्यही वाचन करिती स्वये ॥७८॥ अनुग्रह झाल्यापासू
बाबाचे वैराग्याआली दूण । विटले संसारावरी मन । लागले ध्यास स्वरूपा
॥७९॥ पुढे द्वारकेचे लग्नासाठी । मातोश्रीचे टेमणे बाबापाठी । लागले
तेणे बाबा कष्टी । होती मनीं अपुल्या पैं ॥८०॥ स्वमुखी म्हणाली आईसी
लग्न काळजी गोपाळ कृष्णासी । जो पाळी अनंत ब्रम्हांडासी । तो काय
न करी लग्न हे पैं ॥८१॥ एकदा मातोश्रीचे टेमणे । कन्याविवाहकार
उठोनि माते लागी म्हणणे । विवाह जोडून येतोचि आता ॥८२॥

या माळवेसीवरी राहली रामशास्त्री निर्धारी । तयाचे हृदयीं संचरी । जावोनी
सत्वरी यादवेंद्र ॥८३॥ तेथूनि स्फूर्ति देऊन । रामशास्त्री शेवाळकर आपण ।
पाचारी बाबा लागून । क्षेम पुसते झाले पैं ॥८४॥ बाबा म्हणती आमची कन्या
आता । तुमचे ओटींत घातली सत्यतः । तंव शास्त्रीही तथास्तु बोलता ।
हर्षभरित होऊन त्वरे पैं ॥८५॥ रामशास्त्रीचे नातू । काशीनाथाचे सुपुत्र
असतु । तयालागीवधू योजितु । बाळकृष्णा द्वारका पैं ॥८६॥ तव शास्त्री
बोलती आपण । खचित राधाकृष्णाचेही लग्न । या प्रसंगी करावे मन ।
माझे ऐसे इच्छी पा ॥८७॥ तव गद्रीकर बोलती आपण । उभयवरपक्ष
होणे तुम्हा लागून । आम्ही वधू पक्षी राहू जाण । डोलविली मान रामशास्त्री
ही ॥८८॥ पांगारकर वकील आपण । भेटली गद्रीकरांस जाउन । आणि
बदली लग्न चिंता न्यून । तयारी पूर्ण केली आम्ही ॥८९॥ तुम्ही आपले
भागवत पुराण । वाचणे न सांडावे आपण । तव बोलती बाबा सत्वर करून ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भागवला धरिले काय सोडावया ॥ ९०॥ कन्येकडून आपण । धरिती
बाबा देवका लागून । राधेस्तव चुलत भावाकडून । धरविती देवक
बाबा पैं ॥ ९१॥ वधूसि लागलीया ढळद । वधूसि ज्वर चढला विशद ।
हे देखोनि शारंगधर । अतिथी वेषे पातला की ॥ ९२॥ बाबाही आग्रह
करुन । भोजन देती अतिथी लागून । चिंता नसे अणुमात्र मनीं । काय
होईल म्हणोनिया ॥ ९३॥ अतिथी बाबासी बोलू लागला । म्हणे आशीर्वाद
माझा वधूला । घाबरु नये कोणी आजला । अदृश्य झाला सत्वर गति ॥ ९४
लोटलाचि दोन प्रहर । वधूचाहि उतरला ज्वर । नाहीं आनंदास पारावर ।
वऱ्हाडिया सर्वत्रांच्या ॥ ९५॥ असो लग्न मंडपामाझारी । उभय वधु उभय
बोहल्यावरी । शोभती वाद्ये नाना परी । झडती द्वारी बाबाच्या ॥ ९६॥
ऐसा चार दिवस । लग्न सोहळा झाला विशेष । पुढती आंदण देती
जामातास । बाळ कृष्णासि दिसे ते ते ॥ ९७॥ उपरी संत बाबाचाही

आशीर्वाद । बाळकृष्णा वरी झाला प्रसाद । तेणे गुणे अधिकार विशद ।
वाढला दिसे सांप्रत पैं ॥ ९८॥ असो बाबाही लग्न झाल्यावरी । देह [illegible]
प्रारब्धा करी । घरप्रपंच देती केशवराव करी । सर्वथैव आपुला पैं ॥ ९९॥
मागुते भागवतादि अध्यात्म ग्रंथ । मुमुक्षूसी परिसविती धरोनी प्रीत ।
चरित्र लेखक ही तेथे श्रवण करीत । असे मुखे बाबांच्या ॥ १००॥
स्वये रामशास्त्री येती । गुरुकृपाचि बाबावरी म्हणती । म्हणूनी चित्सागरीहुनी
मुखी येती । अर्थ पूर्ण भाषालहरी ॥ १०१॥ एकदा रामशास्त्रीचे आग्रहावरुन ।
नागेश्वर शास्त्री ही येती आपण । ते दिनी बाबाचे मुखीं भाषण । कांही केल्या
निघेना ॥ १०२॥ परी अष्ट सात्विक भावे करुन । सद्गदीत वाणी झाली म्हणून ।
न निघे पुढती वचन । बाबामुखे प्रयत्न [illegible]के ॥ १०३॥ पुढे नागेश्वर शास्त्री
आपण । श्लोकार्थ सांगती पदच्छेद करुन । बाबा ही अवसरी सावध होऊन ।
श्लोकार्थ वदती जैसा तैसा ॥ १०४॥ असो नागेश्वर शास्त्री ही आपण ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाणती बाबा भगवद् भक्त पूर्ण। ओसंडिता सात्विक भावे करून। न निघे
म्हणोन शब्दमुखे ॥२०५॥ असो पुढां दिने दोन करून। बाबा भागवतमय
होती आपण। शास्त्री पुराणिका वेध लागून। नित्य येती श्रवणासी ॥२०६॥
एकादश स्कंद माझारी। वर्णिली भागवतोत्तमाची थोरी। तेवीचि बाबांठाई
साचोकारी। सर्व प्रकारी विलसे पां ॥२०७॥ एवं बाबा आपण। क्षणक्षणा
विदेही होऊन। हसती रडती गाती स्मरण। करिती कधी कृष्णाचे ॥२०८॥
कन्येचे झालिया लग्न। गढीकर बाबा स्वरूपीं क्रीडती जाण। तोंचि उठिले
मनी स्फुरण। जावे आपण पयोष्णी तीरा ॥२०९॥ ऐसे स्फुरण होतांचि
मनीं। बाबा शोधिती स्थाना लागुनी। तंव अकस्मात आले ध्यानी।
स्थान दत्ताचे थूगावी पँ ॥२१०॥ तेथे भागवत झालियावरी। होतसे ज्ञान
चर्चा निर्धारी। एवं सप्ताह आटोपल्यावरी। अवभृत स्नाने करिती सर्व ॥२१
वँढीकादि सामुग्री सिद्ध होतां। बाबा करिती स्वाहाकार तत्वता। या

प्रसंगासी रामशास्त्री स्वतः। आणि साधु असती बन्सीलाल ॥२२३॥ असो एवं
येथे स्वाहाकार करून। बाबा स्वग्रामा येती आपण। पुढे जाता कांही दिन।
जाती आपण आसे गावी ॥ ११३॥ तेथे पयोष्णी तीरी। बाबानी देखिले
शिवालय निर्धारी। स्वयेचि जाऊन तया माझारी। करिती वंदन गिरिजाधवा
॥ ११४॥ वंदन केलिया उपरी। स्फुरण उठले बाबा अंतरी। कीं भागवत
सप्ताह साचोकारी। पुन्हा येथे करावा ॥२२५॥ सर्व साहित्य जोडल्यावरी।
सप्ताह मांडला शिवमंदिरी। या भागवत सप्ताहामाझारी। रामदास साधु
अंतरी डुल्लती ॥२२६॥ असो भागवत सप्ताह झाल्यावरी। झाली अवभृत
स्नानाची तयारी। सवेचि जाऊनी पयोष्णी तीरी। करिती काला आनंदे ॥११७॥
मुख्य बन्सीलाल साधू आपण। करिती प्रेमभरे काल्या लागून। रामदासादि
बाबा डोलती जाण। भक्तवृंद प्रेमे स्फुंदती ॥२२८॥ पुढें गढीकर बाबा
आपण। इलीचपुरा येती जाण। मुमुक्षु ते अनुग्रह देऊन। बोधामृत पाजिती

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निज भक्ता ॥११९॥ असो माधान ग्रामा माझारीं । जगप्रसिद्ध साधु निर्धारी ।
गुलाबरावनाम साचोकारी । जगदोद्धारा अवतरले ॥१२०॥ हे स्वये आपणालागून ।
ज्ञानेश्वर कन्या घेत असती म्हणोन । नित्य कात्यायनी व्रत स्वीकारुन उत्सव
करिती ठायी ठायी ॥१२१॥ एकदा देऊरवाडा पयोष्णी तीरी । कात्यायनी
व्रतामाझारी । गढीकर बाबा तेही निर्धारी । आमंत्रण ज्ञानेश्वर कन्येचे ॥१२२॥
तेथ बाबा गेलियावरी । अत्यानंद गुलाबराय अंतरी । परस्पर भेटोनी निर्धारी ।
करिती श्री हरी वार्ता मुखे ॥१२३॥ अंतरी श्रीकृष्ण पती मानिती । गोपिका
भाव आपणा कल्पिती । स्वचित भक्तांची स्थिती । आचरती रिती सर्व थॅव ॥१
या कात्यायनी व्रतामाझारी । आनंद दुमदुमला पयोष्णी तिरी । बाबा येती
माघुती घरी । वॅराग्या चढली दूण तेव्हा ॥१२५॥ दरवाज्याची भिंत पडावय
आली निश्चित हे पाहोनिया । बांधावी ही संकल्प करावया । लागले मन
बाबाचे ॥१२६॥ ऐसे असोनि संकल्प उठिला । आणि तो ही बांधा म्हणे

भिंतीला । तरी आतां सोडणेचि या गृहाला । योग्य दिसे सर्वथा माते ॥१२७॥
तंव बाबा म्हणती उदयीक । गृह त्याग करणे आपण निःशंक । जननी म्हणे
आम्हासी शोक । सागरी लोटला काय आता ॥१२८॥ तंव नाइलाजास्तव ।
बाबा म्हणती ऐसा जरी तुमचा भाव । तरी तुम्हीही चलावे सर्व । भरंवसा
ठेवूनि अदृष्टीं ॥१२९॥ एयून कुटुंबासी बोलती वचन । आमचे तुमचे नाते ।
गुरु शिष्याचे जाण । जॅसी आज्ञा मज लागून । गढीकर कांता बोले स्वये ॥१३०॥
त्रिवर्ग पडती गृहा बाहेरी । तो असलपुरा चंद्रभागे तिरी । प्रवेश ती नृसिंह
मंदिरी । ध्यानी बॅसली ब्राम्ह मूहुर्ती ॥१३१॥ तेथे असे आप्ताचे घर ।
तेथोनि अन्न मिळे त्रिवर्गा साचार । शाल ओढोनि दोन प्रहर । ध्यानी
बसती एकांत पॅ ॥१३२॥ मारवाडीन बाई सद्भक्त । नित्य नृसिंहपूजा
अनासक्त । समाधी लावून योगी बॅसले त्रिसत्य । म्हणून बाबावरी अनुदिन
पुष्पें टाकी ॥१३३॥ परी ही बाई द्रव्य कंजुष । परी बाबा कृपे पालटले

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंतर विशेष । त्रिवर्गाची भोजन सामुग्री पाठवीन खास । स्वीकारावी
ऐसी असे मनाची आर्त महाराजा ॥ १३४॥ मागुती बाई मारवाडीन।
पाठवी त्रिवर्ग सामुग्री आपण । कोणी पाहुणे येताही संपूर्ण । लावी
सोय भोजनाची ॥ १३५॥ श्रीमद् भागवत पुराण । बाबा वाचती नरहरी
समोर आपण । तंव वाढू लागले श्रोतृगण । श्रवणा निमित्त राऊळी ॥ १३६।
भागवत चातुर्मासि चालले । भाविकांचे प्रेम बहुसाल वाढले । सुचविती
बाबा सर्वत्रा निर्धारे । दक्षिणा विड्यावरी न ठेवा पँ ॥ १३७॥
रामशास्त्रीही आपण । येते झाले समाप्ति लागून । तई श्रोत्यानीहि
वर्गणी करून । सिद्ध केली भोजन सामुग्री ॥ १३८॥ पुढे अत्यानंदे
समाप्ति होउन । निघाले अवभृत स्नाना लागून । पुढे झाले नगरभोजन ।
नामानंदे हरीच्या ॥ १३९॥ नवल बाबाची अल्पसंगती घडला ।
भक्तिभाव उपजला सकलचित्ता । खचित भक्त योगक्षेम चालविता ।

असे त्रिसत्य जगन्नाथु ॥ १४०॥ उपरी रंगार वासनी येउन । कुटुंबेसह
राहती आपण । भाविक भक्तारवेव देउन । श्रीकृष्ण भजन सोडू नका
म्हणती ॥ १४१॥ एकदा बाईने धोत्र पिळून । केले जलाचे आचमन ।
ते देखताचि बाबा जाण । आकोट ग्रामी जाते झाले ॥ १४२॥
तात्यासाहेबाचे निमित्त । बाबा आकोटा आले सत्य । परी विश्वोद्धार
करणे कृत्य । हाचि हेतु मनीचा पँ ॥ १४३॥ म्हणोनि श्री केशवराव
राऊळी । बाबा भागवत वाचिती सायंकाळी । श्रवणा भाविक भक्त मंडळी ।
अमोघ प्रसादवाणी ऐकण्या येती ॥ १४४॥ अत एव पुराणाचि ये आधी ।
येवोनि बैसे श्रोतृमांदी । भेदाभेद न मानला अवधी । होतसे गर्दी वर्णचारी
॥ १४५॥ कोणी म्हणती बाबा अवतार एकनाथ । कोणी व्यासावतार
मानिती निश्चित । कोणी भगवंत म्हणती यथार्थ । सर्वत्री प्रसार कीर्तिचा
॥ १४६॥ बाबाचे पुराण चालला । सहज श्रोत्याची होय एकाग्रता। कवणा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समाधी लागे तत्वता । भावे स्फुंदता होय कुणी ॥३४७॥ असो सख्य भक्तिची
प्रगटता । बाबाठायी दिसे तत्वता । प्रत्यक्ष वकिला गमे किसा । श्री
गुरुदामोदराचा बाबाने ॥३४८॥ एवं आकोटा माझारी । एकादश स्कंद
चालिला चार मासवरी । समाप्ति प्रसंगा माझारी । भागवत स्वाहाकार झाला पँ
॥३४९॥ बाबासीही दक्षणा । शंभर रुपये अर्पिली जाणा । परी केशवराज
संस्थाना । दिली स्वये गढीकरे ॥३५०॥ भगवंत देशपांडे यांसी । स्वाहाकाराचे
श्रेय निश्चयेसी । तेवीचि भाऊसाहेब पाचपोरयासी । आणि आपासाहेब ~~कुंजित~~ जीत सावकार
॥३५१॥ खचित वैकुंठ पुरीचा भास । या महोत्सवी होतसे सर्वत्रास । पुढती
करिती बाबा प्रस्थानास । गोपाळ खेड ग्रामी पँ ॥३५२॥ तेथेही मिळती
भक्त जन । भोळे भाविक आणि सज्जन । ग्रामा बाहेरी हनुमंत स्थान ।
भागवत पुराण लावले तेथे ॥३५३॥ तेथे साधु मुराराम विरक्त भक्त जाण ।
नारायण गुरु घोंगडे बुवा निष्काम । पँकाजी सकुटुंब ग्राम सोडून । आल्या

संतीणी बहुसाल ॥३५४॥ गोपाळ कृष्णाचे स्मरण । बाबा करिती अंतरीं आपण ।
कधी मधी नामोच्चारण । दीर्घ स्वरे करिती बाबा ॥३५५॥ पुढती बाबा
आकोटी आले । गिरिधारी शेठ यानी पाचारिले । मा तेथ अध्यात्म निरूपण
चाले । बाबामुखे प्रत्यही पा ॥३५६॥ ऐसे थोडे दिवस जाता । बाबाचे शरीरी
वाढली उष्णता । तेणे गुणे पडोनि राहती एकांता । चरित्र लेखक आले त्या
ठायी ॥३५७॥ चरित्र लेखक थांबले बाबापाशी । गीता वाचन पूर्ण केले
निश्चयेसी । बाबाचे अंगीचा ज्वर उतरला परियेसी । आज्ञा घेऊन स्वग्रामा
गेले पँ ॥३५८॥ सीतारामपंत मोहरील । रंगारवासनीचे शिष्य सच्छील ।
यांचे बाबाठायी प्रेम अतुल । न पाडिती ढील सेवेमाजी ॥१५९॥ गढीकर
बाबाचे कृपे करुन । तुकारामपंत वाकंरवे जाण । कृपा प्रसादे काव्य स्फुरण ।
नारायण भजनामृत लिहिले पँ ॥३६०॥ तेवीचि वेदशास्त्र संपन्न । आर्वी
येथील घाटे शास्त्री पूर्ण । ययाचे नातू वासुदेवराव शास्त्री आपण ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पळसोदी येउन राहिले की ॥१६१॥ हे शरीर वाणी मने। सेवा करिती पूर्णपणे
बाबा सेवा देखून निःस्सिम पणे। करिती कृपा तयावरी ॥१६२॥ आपला
मखमली आंगरखा। आणि जरी गोंडा टोपी सर्व पोषाखा। अर्पण केले
वासुदेवा देखा। दिक्षा देउन आपली पॅ ॥१६३॥ पोषाख अंगावरी घालता।
वासुदेव वृत्ति पालटली तत्वता। बाह्यवृत्ति झाली ब्रम्ह करिता। अंतर्मुख
होऊनिया ॥१६४॥ वासुदेव शास्त्रीचे वर्तन। जडभरतवत पूर्ण दिसो लागे जना
लागून। पिशाच्चवत् सर्वदा ॥१६५॥ असो पळसोद येथील भक्त। बाबासाहेब
कुळकर्णी नामे विख्यात। हे बाबालागी आपुले गावांत। आणि ते झाले
भक्ति बळें ॥१६६॥ सद्गुरु नाथालागून। दिला एक सभामंडप बांधून। आणि
शिवपंचायतन स्थापून। गजानन पादुका स्थापिल्या ॥१६७॥ श्री संत बाबाचे
कृपे करुन। झाले यशवंत रावा पुत्र रत्न। नारायण आणि दत्तात्रय दोन।
तिजी कन्या रत्नी ही ॥१६८॥ वामनराव मोहरीर। देशभक्त साचार।

सेवेशी नित्य तत्पर। वाक्काय मने पॅ ॥१६९॥ बाळा भाउ जोशी। हे ही तत्पर
सेवेशी। असती स्वये दिनानिशी। चरणी सत्य बाबांच्या ॥१७०॥ आदि करोनि
बहुभक्त। पळसोदी येउन अनुग्रह घेत। गढीकरती बोधामृत। सर्वा पाजित
प्रेमभरे ॥१७१॥ असो मुख्य सत्शिष्य बाबाचे। खातखेडकर साचे। श्री
बापुराव नाम तयाचे। सांप्रत होते नागपुरीं ॥१७२॥ बाबांचा अनुग्रह
घेतल्यापासून। भक्तिविरक्ति आणि ज्ञान। एके ठायी वस्ती करुन। वाढीस लागली
बापूं ठाई ॥१७३॥ लय विक्षेप आवरण। भंगोनि गेले बापूचे पूर्ण।
जीवनमुक्तीसुख भोगून। आत्मक्रीड आत्मरमण असती पॅ ॥१७४॥ जीव
ब्रम्हात्मैक्य ज्ञाना उपरी। जीवन मुक्ताचे आगामी कर्म निर्धारी। ते तया
न बाधे सर्वपरी। तेवि बापू अलिप्त पॅ ॥१७५॥ असो, एवं ऐसा
अधिकार। बापुरावा बाबा देते झाले साचार। न कळे संत लीळा अपार।
अज्ञ जीवा लागी पॅ ॥१७६॥ श्री गुरुवरी भक्तिपूर्ण। विषया विषयी विरले मन।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपादिती ध्यान योग आपण। बाबा जवळून सत्वर पै ॥१७७॥ नित्य एकांती
बैसून। शमदमे मन आवरून। ध्यानाभ्यास करिती आपण। साक्षात्कार होईतो
॥१७८॥ ऐसिया ध्याना भासे करून। झाला साक्षात्कार सगुण निर्गुण।
जीवनमुक्ति सुख भोगून। होते आपण नागपुरी ॥१७९॥ ययांचे दर्शना प्रोफेसर
सुशिक्षित नर आणि डॉक्टर। वकील मंडळी आदि ऑफीसर। नित्य येती
भाविक पै ॥१८०॥ गुरु पौर्णिमा उत्सव। शिष्य वर्ग मिळोनी सर्व। करिताती
धरोनी भाव। एकनिष्ठे अंतरी ॥१८१॥ तेवीचि ज्येष्ठ वद्य प्रथमेसी।
पुण्यतिथी करिती निश्चयेसी। ऐसा समारंभ नागपुरासी। बापुरावांसी होतो पै
॥१८२॥ असो बापुराव खालखेडकर। ज्ञाननिष्ठ जीवनमुक्त साचार।
शरणागता आत्मविचार। लब्ध होय कृपाबळे ॥१८३॥ एकोणवीससे बहात्तर इसवी
सन। आश्विन वद्य नवमीस जाण। ब्राम्हमुहूर्ती निर्याण। पावले आपण निजात्मीस
॥१८४॥ संतचरित्री चमत्कार। कवी दाविताती फार। परी चमत्काराचा प्रकार

न निष्ठेमाजी नसे ॥१८५॥ बाबा ज्ञान सिद्ध असती। चमत्कारा भीक न
घालिती। एक वासुदेवची देखती। निजांगेसी भूतमात्रीं ॥१८६॥ शापसामर्थ्य
येथ न दिसे। परी अनुग्रह सामर्थ्य येथ विलसे। ऐसा महात्मा विरळ असे।
वसुंधरा पृष्ठावरी ॥१८७॥ देह प्रारब्ध असे जोंवरी। तंव जीवनमुक्त दिसे
कर्मचारी। प्रारब्ध संपताचि निर्धारी। विदेह कैवल्य लाभे तया ॥१८८॥
बाबा पळसोद ग्रामी असतां। संपले देह प्रारब्ध तत्त्वता। देह पावे पंचत्वता।
तेही वार्ता ऐका पां ॥१८९॥ मुखी नाम गोविंद गोपाळ। बाबांचे चाले सर्व
काळ। पातला समाधीचा वेळ। तैं न चाले बळ वाणीचे ॥१९०॥ तोंचि
यशवंत राव उठोन। बाबांसी मांडी देती आपण। बाबा रसास्वाद वळगून।
परब्रम्हीं लीन होती पैं ॥१९१॥ सावित्री पौर्णिमा समाधी दीन। एकोणवीससे
...सि ईसवी सन। ज्येष्ठ शुद्ध मासी निर्याण। पावले आपण निजात्मीं ॥१९२॥
और्ध्व दैहिक विधिपूर्ण। झाला सभामंडपालागून। तेथेचि यशवंतरावांनी आपण।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिधले बांधून राऊळ पँ ॥१९३॥ तया राऊळी दत्तमूर्ति स्थापना। करोनि
प्रतिष्ठिल्या पादुका जाणा। भावे प्रतिदिनी देवतार्चना। करिती वंदना यशवं
॥१९४॥ प्रतिवर्षी पौर्णिमेस। न विसरती बाबा श्राद्धदास। ज्येष्ठ वद्य प्रथमे
पुण्यतिथी करिताती ॥१९५॥ द्वितीयेला कीर्तनकाला। बाळकृष्ण शास्त्री
करिती भला। एवं दिनत्रय उत्सव सोहळा। जातसें केला पकसोदी ॥१९६
गुरुवार आणि एकादशी। तेवीचि पौर्णिमा या दिवशी। ग्रंथ पारायण
पादुकापासी। दिनत्रय निश्चयेसी होतु असे ॥१९७॥ या चरित्र ग्रंथाचे।
पारायण ऐकती जें ते भाग्याचे। पुण्य फळले म्हणावे त्यांचे। होती सद्गतीचे
ग्राहक पँ ॥१९८॥ जे भावे वाचती ऐकती। तया प्राप्त होय क्रम मुक्ती
सत्य लोकीं जाऊन प्रलयांती। ब्रम्हीभूत जाती होउनिया ॥१९९॥ नित्य सप्ताह
पारायण। करिता प्रसन्न होय नारायण। मळ विक्षेप जाती झडोन। अज्ञान
आवरण भंगे पँ ॥२००॥ एवं या चरित्राचे महिमान। अन्यथा न मानावे व

दुःचित्ते करितां वाचन। न मिळे समाधान सर्वथा ॥२०१॥ ऐसे हे संक्षिप्त
चरित्र। गायिले मी असोनि अपात्र। ते क्षमा करोत व्यापक सर्वत्र।
संत गाडीकर बाबा पँ ॥२०२॥ असो बाबांचे चरण स्मरण। करोनी ग्रंथ
चरणीं अर्पण। स्वल्प सेवा ही म्हणोन। श्री दास आपणकरी भावे ॥२०३॥
श्री समर्थ सद्गुरु गाडीकरकृपे भले। श्रीदास विरचित चरित्र संक्षिप्त केले।
नित्य हृदयीं वसोत पाऊले। श्री सद्गुरुची या दासा ॥२०४॥

॥ श्री रस्तु ॥ ॥ हरिः ॐ तत् सत् ॥

॥ श्रीमत् सद्गुरु बाबासाहेब चरणार्पणमस्तु ॥

रविवार

दि० २१.४.१९७४.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्री सद्गुरु समर्थ श्री बाबासाहेब महाराज गढीकर
यांचें हें ओवीबद्ध संक्षिप्त चरित्र श्री०चिन्
मय वासुदेवराव वाघासुंदर रा० नागपूर यांनी केलें
तें उत्कृष्ट झालें आहे. भक्तगणांनी याचें रोज
पारायण करावें. याकरितां हें अत्यंत उपयुक्त आहे.

मु० अचलपूर सिटी } बाळकृष्ण काशीनाथ शेवाळकर.
ता० १०।११।१९५८ }

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

SHIRT

MAN

SUIT SPEC

मारवडकर टेल

किल्ला रोड, महाल, नागपुर.

(सोमवार बंद)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=19.07.19 16:38
,TRANSFERRED=2019/07/19 at 16:45:55
,PAGES=19
,TYPE=STD
,NAME=S0001038
,Book Name=M-1986-CHARITRA KAUSTUBHAMNI EKADHEYAYI SANKSHIPT CH
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection